Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-I JANUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# समकालीन इतिहास आणि त्याच्या मर्यादा

प्रा.कल्याण राजेंद्र वटाणे
सहाय्यक प्राध्यापक,
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत
जिल्हा – अहमदनगर

**प्रास्ताविक:—**

इतिहास या शब्दाचा अर्थ इति + ह+ आस म्हणजे असे घडले. मनुष्य हा अविभाज्य घटक आहे. तो निसर्गाचा भाग असल्याने तो त्याला मोठया प्रमाणात जाणुन घेण्याचा प्रयत्न करतो. जेवढे निसर्गाला जाणून घेतो. त्याचे प्रस्तुतीकरण इतिहासलेखन शास्त्राच्या माध्यमातून करत असतो. अर्थात गतकाळात जे काही घडलेले असते ते सर्व इतिहासाच्या कक्षेत सामावते. आणि त्या घडून गेलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावला की इतिहास आकाराला येतो. पण यासाठी साधनांची आवश्यकता महत्वाची असते म्हणून रॅन्के सारखे अभ्यासक साधनाशिवाय इतिहास लेखन करणे अशक्य मानतो. म्हणुन तो म्हणतो नो डॉक्यूमेंट नो हिस्ट्री (No documents no history) असे असले[१] तरी वस्तुनिष्ठ इतिहास लेखनासाठी व्यक्तिनिष्ठतेची मर्यादा आडवी येत असते. निव्वळ वस्तुनिष्ठ लेखन ठोकळेबाज ठरण्याची शक्यता असतानाच व्यक्ती निष्ठतेमुळे ती कादंबरी ठरण्याचाही धोका असतो. भूतकाळाशी सातत्यपुर्ण साधलेला संवाद म्हणजे इतिहास होय असे ई.एच.कार सांगाते.[२] इतिहास घडविण्याचा योग्य मार्ग म्हणजे तो लिहिणे हा होय. म्हणजे इतिहासकाराने इतिहासलेखन केल्यावरच इतिहास आकारला येतो. त्याचबरोबर सर्व इतिहास हा विचारांचा इतिहास असतो. एका विशिष्ट व तात्वीक अर्थाने सर्व इतिहास समकालीन असतो.[३] इतिहास अभ्यासाची चौकट विस्तारली असून संशोधक मनुष्य जीवनाच्या विविध आयामाचा अभ्यास वेगवेगळया पातळीवर करु लागले आहे. समकालीन इतिहास एक महत्वाचा पैलू इतिहासात मानला जातो.

बेनेटो क्रोसे यांच्या मते सर्व इतिहास हा समकालीन असतो. भूत व वर्तमान कालखंडातील घटना या सारख्याच वाटत असल्यामुळे जाणवत असल्याने या सर्व घटना एका सामाईक प्रक्रियेने जोडलेल्या असतात.[४] हे क्रोसेचे मत जाणून घेतानाच त्याच्या ऐतिहासिक तत्वज्ञानाचा थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. तो मानवी चेतनेला महत्वाचे मानतांना तो सौंदर्यसमिक्षा, तर्कशुध्दता, अर्थशास्त्रीय व नैतिक नितीविषयक विचार या चेतना महत्वाच्या मानतो. या चेतना स्त्रोतांच्या विचारातून इतिहासातील घटनाचे कारण समजू शकतो. व या विचारावर इतिहास अवलंबून असतो. हा सिध्दांत मांडतो. आणि याच प्रेरणा इतिहासात सर्वकाळ समान असल्यामुळे सर्व इतिहास समकालीन वाटतो.[५] विसाव्या शतकात शेवटच्या टप्प्यात पाश्चात देशातील इतिहासकारांनी विपुल प्रमाणात समकालीन इतिहास लिहिण्यास सुरुवात केली गेली. पण तुलनेत भारतीय इतिहास संशोधक यांच्याकडून या संदर्भात प्रयत्न होतांना दिसत नाही.

समकालीन इतिहास म्हणजे नजिकच्या गतकाळ असा असले तरी ही संज्ञा प्रामुख्याने विसाव्या शतकाच्या इतिहासा बद्दल वापरतांना दिसतात. अलिकडील कालखंडाचा आलेख रेखाटताना महत्वाच्या व्यक्तींना केंद्रीभूत मानुन इतिहास लेखनाचे प्रयत्न समकालीन इतिहासाच्या माध्यमातून केले गेले असले तरी काही घटनाचा ही यात अभ्यास केला गेला आहे. मुख्यत्वे करुन हे लेखन हयात व्यक्तीच्या चरित्रलेखनातील लिखाण आहे.[६] अर्थात विसाव्या शतकाचे वेगळेण म्हणजे लोककल्याणकारी संस्था व सुधारणावादी व्यक्तीचा उदय होय. कोणत्याही प्रांत व देशाच्या जडण घडणीत व वाटचालीमध्ये व्यक्तीचे योगदान महत्वाचे असते. कर्तृत्ववान व्यक्तीच्या अभावी त्या राष्ट्र व प्रदेशाचा इतिहास निरस अर्थशुन्य व घटना शुन्य बनतो. एखादया देशाच्या व राज्याच्या इतिहासातून जर कर्तृत्ववान व्यक्ती वजा केल्यावर त्या इतिहासामध्ये काहीच शिल्लक राहत नाही. अर्थात कर्तृत्ववान व्यक्तीच्या जीवनावर त्यांच्या जिवन काळातच संशोधन करण्याची पध्दत विविध विद्यापिठात प्रचलित असलेली दिसते. [७] अर्थात संशोधकाच्या जीवन कालखंडाशी जवळीक साधणारा असेल तर हे

समकालीन इतिहासाच्या कार्यक्षमतेत येते. किंबहुना चालू कालखंडातील समस्या तथा प्रश्नांवर अवलंबून असलेल्या ऐतिहासिक घटना यांचा अभ्यास यात येत असला तरी काही व्यक्तींच्या चरित्र लेखना बरोबरच संस्थाच्या स्वरुपातील हे लिखान असतांना दिसते. विसाव्या शतकातील ठराविक घटना व घडामोडीचा माग यात काढावा लागतो. समकालीन कागदपत्रे याच्या आधारे ज्या घटना संस्थांचा संबंध समकालीन घडामोडीशी येतो. अशा घटनांची नोंद समकालीन इतिहासात केली जाते. [९]समकालीन घटनांची स्वरुप समजावून घेण्याकरीता तत्कालीन वृत्तपत्रे, नियतकालीके, व्यक्तीगत हस्तलिखित व पत्र व्यवहार अभ्यासावे लागतात. समकालीन लोकांची मते नोंदवावी लागतात.

इतिहास लेखन करीत असतांना समकालीन इतिहासाचे ऐतिहासिक महत्व असले तरी त्याच्या मर्यादा किंवा संबंधित अडचणी जाणल्याशिवाय आपणाला पुढे जाता येणार नाही. समकालीन इतिहास लेखनाला पुष्ठी देणारे पुरावे मांडावे लागतात. त्याकरीता समकालीन साधने धुंडाळणे गरजेचे असते. पण प्रत्यक्षात ती गोळा करताना अनंत समस्या प्रकर्षाने जाणवतात. शिवाय गोळा केलेल्या साहित्यामध्ये वर्गीकृत असे लिखाण मिळत नाही. शासकीय कागद पत्रांबाबत नोकरशाही उदाशीन दिसते. त्यामुळे घटनेच्या मुळात जाण्यास अडचण होताना दिसते. लिखित स्वरुपाची साधने मुबलक प्रमाणात असली तरी व्यक्तीनिष्ठतेची त्यावर छाया पडत असतांनाच अप्रकाशीत साधनांचा तुटवडा जाणवतो.[९]लिखित साधनांच्या उपलब्धते बरोबरच मौखिक साधने समकालीन लेखनात उपयोगी ठरतात. असे असले तरी त्यांच्या मर्यादा लक्षात घेतानाच सावधानतेने त्याचा उपयोग करणे गरजेचे ठरते. मुलाखत सर्वेक्षण तत्सम पध्दती यात महत्वाच्या असल्या तरी त्याचे लेखन करुन जतन करणे हे महत्वाचे असते. ते भविष्यातिल अभ्यासकांच्या दृष्टीने महत्वाचे असते. समकालीन घटना असल्याने वाचकत्याला टिकात्मक पध्दतीने घेतो त्यामुळे त्याला राजकीय अर्थात राजकीय पुर्वग्रहदुषीत दृष्टीकोन असण्याची शक्यता नाकारता येत नाही, किंबहुना त्यामुळे त्याला मोठया प्रमाणात आव्हान मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये पुर्वग्रहदुषित मत आडसर ठरतांना दिसते. म्हणुन वस्तुनिष्ठतेतून याचे लेखन होणे गरजेचे असते. पण यात लेखन व्यक्त करत असल्याने व्यक्तीनिष्ठतेची अंतर्भूतता होते. समकालीन इतिहासात व्यक्तींचा वस्तुनिष्ठ आलेख मांडणे आव्हानात्मक आहे. [१०]व्यक्ती बद्दलची सर्व घटना लिहीतांना मर्यादा पडते. तसेच त्या घटनेचे सर्व पदर उलघडताना आडचण येताना दिसते.

समकालिन इतिहास समाज व वाचकापुढे प्रकर्षाने मांडत असतांनाच यात विविध समस्या व मर्यादा यांचा सामना संशोधकाला करावा लागत असला तरी त्याचे ऐतिहासिक महत्व डोळयाआड करता येणार नाही. नजिकच्या कालखंडाचे आकलन होण्याच्या दृष्टीने हे लेखन महत्वाचे आहे. समकालीन इतिहास लेखनामुळे समाज मनात उत्सुकता निर्माण होतानाच वाचकांच्या टिकांनाही सामोरे जावे लागते. यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन मिळणेही महत्वाचे आहे. चिमटीतून सुटलेल्या क्षण:घटकांची नोंद होणेच्या दृष्टीने अर्थात सध्याच्या वर्तमान हा उदयाचा भूतकाळ असतो. व त्याची नोंद समकालीन इतिहास लेखनाच्या माध्यमातून घेतली जाते. म्हणून त्याचे ऐतिहासीक महत्व नाकारणे शक्य होणार नाही.

### संदर्भ साधन सूची :–

१. Arvind Padhi, History and Historical Research Theory and Method, Murarilal & Sons New Delhi. पृ.क्र.८
२. ई.एच.कार (अनु) प्रा.वि.गो.लेले, व्हॉट इज हिस्ट्री, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे ३०, १९९४ पृ.क्र.१४६
३. डॉ. प्रभाकर देव, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती मार्च १९९७,पृ.क्र.११
४. शांता कोठेकर, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, श्रीसाईनाथ प्रकाशन नागपुर, व्दितीय आवृत्ती २००७ पृ.क्र.१५
५. बी.एन.सरदेसाई, इतिहास लेखन पध्दती फडके प्रकाशन, कोल्हापूर, तृतीय आवृत्ती २०११ पृ.क्र.९
६. पुर्वोक्त Arvind Padhi पृ.क्र.९,
७. हरिष भैलुमे अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, सुशिलकुमार शिंदे यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीतील योगदान,पृ.क्र.१३.
८. पुर्वोक्त Arvind Padhi पृ.क्र.३७,
९. सोमनाथ रोडे व इतर (संपा) संशोधन पत्रिका २०१६, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद जानेवारी २०१७
१०. अवनीश पाटील, अध्यक्षीय भाषण अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद २०१६ पृ.क्र.२२६,२७.



CamScanner